# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

**बुधवार, दिनांक १७ ऑगस्ट, २०२२/श्रावण २६, १९४४ शके**

**संदर्भ : या सचिवालयाचे पत्रक भाग-२ क्रमांक ३६, दिनांकित ५ मार्च, २०२०**

**१०८.** मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिलेल्या निदेशानुसार औचित्याचे मुद्दे प्रधान सचिव यांच्या दालनात सकाळी ९.०० ते ९.३० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. सदर मुद्दे स्वीकारण्यासाठी प्रधान सचिव यांच्या दालनात सकाळी ९.०० ते ९.३० या कालावधीत एक पेटी आणि सोबत नोंदवही ठेवण्यात येईल. सदर पेटीमध्ये मा. सदस्यांना जो औचित्याव्दारे मुद्दा उपस्थित करावयाचा असेल तोच मुद्दा त्यांच्याकडून टाकण्यात यावा व त्याबाबतची नोंद नोंदवहीमध्ये करण्यात यावी. सकाळी ९.३० वाजल्यानंतर कोणत्याही सदस्यांचे औचित्याचे मुद्दे स्वीकारण्यात येणार नाहीत. त्यानंतर सकाळी १०.३० वाजता तसेच मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी वेळोवेळी दिलेल्या निदेशानुसार औचित्याच्या मुद्दयाचे बॅलट काढण्यात येईल व सदस्य निहाय २५ मुद्दे घेण्यात येतील. त्याचप्रमाणे बॅलटमध्ये आलेल्या सदस्याने त्याच दिवशी मुद्दा सभागृहात उपस्थित न केल्यास तो मुद्दा व्यपगत समजण्यात येईल व त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही. त्याबाबतची सूची प्रधान सचिव यांच्या दालनात तसेच जेथे सदस्यांचा उपस्थिती पट ठेवण्यात येतो तेथे ठेवण्यात येईल.

**विधान भवन,**
मुंबई
दिनांक : १७ ऑगस्ट, २०२२.

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

**<u>याची प्रत:-</u>**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
३. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव.
४. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
५. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील पक्ष कार्यालये.
६. संगणक कक्ष (WEBSITE)
७. एम.के.सी.एल कक्ष (MKCL)